# *महाराष्ट्र विधानसभा*

## *दिवसाच्या कामकाजाचा क्रम*
## *शुक्रवार, दिनांक १० मार्च, २०१७*
## *(सकाळी ११.०० वाजता)*

*एक : प्रश्नोत्तरे.*

*दोन : शोक प्रस्ताव -*

*श्री.चंद्रकांत खंडेराव देशमुख, माजी वि.स.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव.*

*तीन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -*

*(१) नियोजन मंत्री : विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये नियोजन विभागाचा सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षातील योजनातंर्गत आणि योजनेत्तर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवतील.*

*(२) संसदीय कार्य मंत्री : विधानसभेच्या सन २०१६ च्या चौथ्या (हिवाळी) अधिवेशनात दिनांक ५ डिसेंबर, २०१६ ते दिनांक १७ डिसेंबर, २०१६ या कालावधीत मा.मंत्री/ मा.राज्यमंत्री महोदयांनी विधानसभा सभागृहात दिलेल्या एकूण १९३ आश्वासनांची यादी तसेच सन २०१६ चे चौथे (हिवाळी) अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर आतापर्यंत पूर्तता करण्यात आलेल्या एकूण १५३ आश्वासनांच्या विवरणपत्रांची यादी सभागृहासमोर ठेवतील.*

*चार : स्थगन प्रस्तावाच्या सूचना — (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये).*

*पाच : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :*

*(दिनांक ९ मार्च २०१७ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना क्र.१ ते ३)*

*(१) सर्वश्री भास्कर जाधव, अजय चौधरी, विजय औटी, सुनिल शिंदे, सुनिल प्रभू, राजन साळवी, ॲड. भीमराव धोंडे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वन मंत्र्याचे लक्ष वेधतील :-*

*"रत्नागिरी जिल्हयातील चिपळूण शहराच्या वेगवेगळया भागात दिनांक ३० डिसेंबर, २०१६ ते ८ जानेवारी, २०१७ या कालावधीत अवैध तस्करीसाठी ३७ सोफासेटमध्ये कोट्यवधी रुपये किंमतीचे सुमारे १४ टन रक्तचंदन लपविण्यात आल्याचे निदर्शनास येणे, त्यासाठी शहराजवळील मिरजोळी गावच्या हद्दीत पत्र्याची शेड उभारून रक्तचंदन लपवून सोफासेट बनविण्याचा सुरु असलेला कारखाना, हा कारखाना गत काही वर्षांपासून सुरू असल्याने अन्य राज्यांतून वाहनांमधून एवढया मोठया प्रमाणात रक्तचंदन आणले जात असताना एकदाही कारवाई न झाल्याने तपासणी नाक्यांवर होणाऱ्या तपासणीबाबत निर्माण झालेली शंका, दक्षिणेकडील राज्यातून आणण्यात आलेले रक्तचंदन स्थानिकांच्या माध्यमातून समुद्र मार्गे परदेशात पाठविण्यात येणार असल्याचा व्यक्त होत असलेला संशय, मुख्य सुत्रधाराचे नाव समजूनही वन विभाग तसेच पोलीस तपास यंत्रणांना त्याचा शोध न लागणे, तसेच उरण, जि.रायगड येथील जेएनपीटी बंदरातील जेडब्ल्युआर कंटेनर गोदामात बेकायदा रक्तचंदनाचा साठा मुलतानी माती असल्याच्या बनावाखाली लपविण्यात येणे, कोट्यवधी रुपये किंमतीच्या रक्तचंदनाची राजरोसपणे तस्करी होत असतांनाही पोलीस व डीआरए विभागाला रक्तचंदनाच्या तस्करीतील आरोपींना पकडण्यात येत असलेले अपयश, नागरिकांमध्ये तस्कर, वन अधिकारी व पोलीस यांचे आर्थिक संगनमत असल्याचा वाढता संशय, असे असतानाही या तस्करी प्रकरणाचा तपास अचानक थांबविण्यात आल्याने गुन्हेगारांना शासनाने अभय दिल्याची निर्माण झालेली भावना, अवैध रक्तचंदनाची तस्करी करणाऱ्यांविरुध्द तात्काळ कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."*

*(२) सर्वश्री. मनोहर भोईर, राधाकृष्ण विखे-पाटील, विजय वडेट्टीवार, अमीन पटेल, अमित देशमुख, अब्दुल सत्तार, अमर काळे, मो. आरिफ (नसीम) खान, सुनिल केदार, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पर्यावरण मंत्र्याचे लक्ष वेधतील :-*

*"तळोजा औद्योगिक परिसरातील कारखाने विघातक व विषारी पाणी सोडून जलवायू प्रदूषण करीत असल्याने या परिसरातील नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास येणे, सिध्दीविनायक या मच्छि कारखान्यातील विषारी पाणी घोट व कासाडी नदीच्या पात्रात सोडल्याने या कंपनीच्या परिसरातील घोट, घोटचाल, भोईपाडा, देवीचा पाडा, तोंडरे, पेंधर, नावडे कॉलनी, तळोजा फेज १ व तोंडरे इ. २५ गावातील नागरिकांना आजाराची झालेली लागण, तसेच विहिरी व बोअरवेलचे पाणी प्रदूषित होणे, नदीतील मासळी नष्ट होऊन शेतीचे होत असलेले नुकसान, परिणामी तेथील पारंपारिक मच्छिमार व शेतकरी यांच्यावर आलेली उपासमारीची वेळ, याबाबत मा.विरोधी पक्षनेता विधानसभा यांनी दिनांक २० फेब्रुवारी, २०१७ रोजी संबंधित कंपनीवर कारवाई करण्याची पत्राद्वारे मागणी करुनही याकडे शासनाने केलेले दुर्लक्ष, तसेच सदर औद्योगिक वसाहतीमधील प्रदुषित पाणी नावडा खाडीत सोडल्यामुळे नावडा ते खारघर कोपरा खाडीमधील खारफुटी नष्ट होणे, मुंबई वेस्ट मॅनेजमेंट कंपनी रासायनिक प्रक्रिया करुन घातक जैविक कचऱ्याचे विघटन करीत असल्याने होणाऱ्या वायू दुर्गंधीमुळे नागरीकांना कान, नाक, घसा व डोळे यांच्या आजारांची झालेली लागण, यासंदर्भात नागरीकांनी तक्रार करुनही संबंधीत कंपन्यांवर शासनाने कोणतीही कारवाई न करणे, परिणामी नागरीकांमध्ये पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."*

*(३) सर्वश्री. विजय वडेट्टीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, सुनिल केदार, अमर काळे, अस्लम शेख, अमीन पटेल, डॉ. संतोष टारफे, सर्वश्री. राहुल बोंद्रे, हर्षवर्धन सपकाळ, श्रीमती निर्मला गावित, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री.नितेश राणे, शरद सोनावणे, कालीदास कोळंबकर, सरदार तारासिंह, किसन कथोरे, संदीप नाईक, जितेंद्र आव्हाड, बळीराम सिरसकर, संजय केळकर, शशिकांत शिंदे, जयंत पाटील, पृथ्वीराज चव्हाण, मो.आरिफ (नसीम) खान, अब्दुल सत्तार , शेख आसिफ शेख रशीद, ॲड. यशोमती ठाकूर, डॉ. पतंगराव कदम, श्री. संग्राम थोपटे, श्रीमती दिपिका चव्हाण, सर्वश्री. वैभव पिचड, सुनिल प्रभू, डॉ. राहूल पाटील, सर्वश्री. हसन मुश्रीफ, दिलीप वळसे-पाटील, अजित पवार, पांडुरंग बरोरा, सुनिल शिंदे, राजन साळवी, संदीपानराव भुमरे, बाळासाहेब मुरकुटे, दत्तात्रय भरणे, राणाजगजीतसिंह पाटील, विनायकराव जाधव-पाटील, ॲड. भीमराव धोंडे, श्री.राहुल कुल, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे राज्य उत्पादन शुल्क मंत्र्याचे लक्ष वेधतील :-*

*"अहमदनगर जिल्हा सामान्य रूग्णालयाच्या कॅन्टीनमध्ये बनावट दारू निर्मितीचा व्यवसाय सुरु असल्याचे दिनांक १५ फेब्रुवारी, २०१७ रोजी निदर्शनास*

*येणे, जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या कॅन्टीनमधील बनावट दारु सेवन केल्यामुळे पांगरमल येथील दहा लोकांचा झालेला मृत्यु, सदर ठिकाणी पोलीसांनी टाकलेल्या छाप्यात विविध कंपन्यांचे बुच, प्लास्टिक कव्हर, रिकाम्या बाटल्या, थिनर, चॉकलेटी फुड कलर असे बनावट दारु तयार करण्याचे साहित्य जप्त करणे, गत अनेक वर्षापासून जिल्हा रुग्णालयाच्या कॅन्टीनमध्ये वैद्यकीय अधिकारी व पोलिसांच्या संगनमताने सदर बनावट दारु तयार करण्याचा व्यवसाय सुरु असल्यामुळे नागरिकांमध्ये पसरलेली भिती, परिणामी याची उच्चस्तरीय अधिकाऱ्यांमार्फत चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."*

*(४) डॉ. बालाजी किणीकर, सर्वश्री. नितेश राणे, शरद सोनावणे, कालीदास कोळंबकर, सरदार तारासिंह, अमीन पटेल, राधाकृष्ण विखे-पाटील, पृथ्वीराज चव्हाण, अस्लम शेख, मो. आरिफ (नसीम) खान, प्रा. वर्षा गायकवाड, डॉ. संतोष टारफे, सर्वश्री. विजय वडेट्टीवार, बाळासाहेब थोरात, संग्राम थोपटे, डॉ. पतंगराव कदम, श्रीमती निर्मला गावित, सर्वश्री. सुनिल केदार, विजय औटी, सुनिल प्रभू, जयंत पाटील, शशिकांत शिंदे, हसन मुश्रीफ, राजन साळवी, संजय पोतनीस, अजय चौधरी, अजित पवार, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री. वैभव पिचड, राणाजगजीतसिंह पाटील, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सामाजिक न्याय मंत्र्याचे लक्ष वेधतील:-*

*"चेंबूर (मुंबई) येथील सामाजिक न्याय विभागामार्फत चालविण्यात येणा-या संत एकनाथ मुलांच्या वसतिगृहात विद्यार्थ्यांना देण्यात येणा-या आहारात पाल सापडल्याचे दिनांक १२ फेब्रुवारी, २०१७ रोजी निदर्शनास येणे, वसतिगृहात पुरविण्यात येणा-या जेवणात यापूर्वीही काचेचे तुकडे व गोगलगाय आढळल्यामुळे वसतिगृहातील १५० विद्यार्थ्यांनी वसतिगृह अधीक्षकांकडे अन्न धान्याचा पुरवठा करणाऱ्या कंत्राटदाराविरुध्द तक्रारी करुनही संबंधितांनी कोणतीच दखल न घेणे, सामाजिक न्याय विभागाद्वारे कंत्राटदारांना आलटून पालटून कंत्राटे देण्यात येत असल्याचा गंभीर आरोप चेंबूर येथील विद्यार्थ्यांनी करणे, झुरळ, उंदराच्या लेंड्या, काचेचे तुकडे व खडे जेवणात सापडत असल्याने विद्यार्थ्यांनी शासनाकडे तक्रार करुनही कंत्राटदाराविरुध्द कोणतीच कारवाई न होणे, अजूनही वसतिगृहांना भेसळयुक्त अन्नधान्याचा पुरवठा होणे, परिणामी वसतिगृहातील विद्यार्थ्यांमध्ये पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."*

*(५) सर्वश्री. हर्षवर्धन सपकाळ, राधाकृष्ण विखे-पाटील, विजय वडेट्टीवार, अमीन पटेल, सुनिल केदार, अमित देशमुख, अब्दुल सत्तार, अमर काळे, मो.आरिफ (नसीम)*

*खान, कुमारी प्रणिती शिंदे, श्रीमती निर्मला गावित, प्रा. वर्षा गायकवाड, ॲड. यशोमती ठाकूर, श्री.राहुल बोंद्रे, प्रा. विरेंद्र जगताप, डॉ. संतोष टारफे, सर्वश्री. जयंत पाटील, राजेश टोपे, शशिकांत शिंदे, श्रीमती दिपिका चव्हाण, सर्वश्री. प्रदीप जाधव-नाईक, वैभव पिचड, डॉ. सतीश पाटील, श्री. सुनिल प्रभू, डॉ. राहूल पाटील, सर्वश्री. हनुमंत डोळस, हसन मुश्रीफ, दिलीप वळसे-पाटील, अजित पवार, पांडुरंग बरोरा, सुनिल शिंदे, एकनाथराव खडसे-पाटील, दत्तात्रय भरणे, ज्ञानराज चौगुले, ॲड.भीमराव धोंडे, सर्वश्री. राजन साळवी, राणाजगजीतसिंह पाटील, तान्हाजी मुटकुळे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे पणन मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-*

*"राज्यात यंदा तुरीचे विक्रमी उत्पादन झाल्याने तुरीची आवक सुरु होताच बाजारपेठेत तुरीचे दर घसरण्याची झालेली सुरुवात, शेतक-यांना आधारभूत किंमतीनुसार भाव मिळावा यासाठी नाफेडच्या माध्यमातून सुरु केलेली तुरीची खरेदी, एकीकडे तुरीची आवक असतांना प्रशासनाने पुर्व तयारी म्हणून पोत्याची व्यवस्था न केल्याने थांबविण्यात आलेली खरेदी, खरेदी केंद्रावर पडलेले तुरीचे ढीग, शासनाने खरेदी केलेल्या तुरीच्या चुकाऱ्याची किंमत २२ कोटी ४५ लाख रुपये असून आतापर्यंत केवळ साडेआठ कोटीचे चुकारे अदा करण्यात येणे, तुरीचा हमीभाव ५ हजार ५० रुपये असतांना शेतकऱ्यांना ४ हजार १०० रुपये प्रति क्विंटल दराने तुर विकावी लागत असल्याने शेतकऱ्यांचे होत असलेले आर्थिक नुकसान, तुरीची आवक वाढत असतांना शेतकऱ्यांना दोन-दोन दिवस खरेदी केंद्रावर थांबून सुध्दा शेतकऱ्यांकडून तुर खरेदी करण्याऐवजी खाजगी व्यापाऱ्यांकडून तुर खरेदी करण्यात येत असल्याचे दिनांक ७ फेब्रुवारी, २०१७ रोजी निदर्शनास येणे, अद्यापही तूर संपूर्ण प्रमाणात विक्री झालेली नसल्यामुळे नाईलाजास्तव कमी दरात व्यापाऱ्यांना तुर विकण्याची शेतकऱ्यांवर आलेली वेळ व त्याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, त्यामुळे शेकऱ्यांमध्ये पसरलेला असंतोष, त्यामुळे हमी भावानुसार शेतकऱ्यांकडून तूर खरेदी करण्याबाबत शासनाने करावायाची कार्यवाही व प्रतिक्रिया."*

*सहा : राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा (दुसरा व शेवटचा दिवस).*

*सात : शासकीय विधेयके :*

*(अ) पुर:स्थापनार्थ :-*

*(१) सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४ - मुंबई महानगरपालिका,*

***महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१७.***

***(२) सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६ - महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) (सुधारणा) विधेयक, २०१७.***

---------------------------------------------------------------------------------------------------
-------

*(ब) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-*

*(१) (क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री. अमीन पटेल, हर्षवर्धन सपकाळ, राधाकृष्ण विखे पाटील, अजित पवार, दिलीप वळसे पाटील, जयंत पाटील, भास्कर जाधव, संजय कदम, डॉ.सतीश पाटील, सर्वश्री. दिपक चव्हाण, वैभव पिचड, बाळासाहेब पाटील, संदिप नाईक, अबु आझमी, जयदत्त क्षीरसागर, राजेश टोपे, श्रीमती दिपिका चव्हाण, सर्वश्री. विजय वडेट्टीवार, राणाजगजितसिंह पाटील, हनुमंत डोळस, राहुल मोटे, सुरेश लाड, हसन मुश्रीफ, पांडुरंग बरोरा, जितेंद्र आव्हाड, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-*

*"ही विधानसभा सन २०१७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३ — मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) अध्यादेश, २०१७ नापसंत करते."*

*(ख) सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक २ - मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१७.*

*(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-*

*"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक २ — मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."*

*(घ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.अस्लम शेख, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-*

*"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक २ — मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."*

*(ङ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अमर काळे, सुनील केदार, विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-*

*"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक २ — मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३६ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."*

*(च) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-*

*"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक २ — मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."*

*(छ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.हर्षवर्धन सपकाळ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-*

*"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक २ — मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या १५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."*

---

*(२) (क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री. अमीन पटेल, हर्षवर्धन सपकाळ, राधाकृष्ण विखे पाटील, अजित पवार, दिलीप वळसे पाटील, जयंत पाटील, भास्कर जाधव, संजय कदम, डॉ.सतीश पाटील, सर्वश्री. दिपक चव्हाण, वैभव पिचड, बाळासाहेब पाटील, संदिप नाईक, अबु आझमी, जयदत्त क्षीरसागर, राजेश टोपे, श्रीमती दिपिका चव्हाण, विजय*

*वडेट्टीवार, राणाजगजितसिंह पाटील, हनुमंत डोळस, राहुल मोटे, सुरेश लाड, हसन मुश्रीफ, पांडुरंग बरोरा, जितेंद्र आव्हाड, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-*

*"ही विधानसभा सन २०१७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ५ — महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) अध्यादेश, २०१७ नापसंत करते."*

*(ख) सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३ — महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०१७.*

*(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-*

*"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ३ — महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."*

*(घ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.अस्लम शेख, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-*

*"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ३ — महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."*

*(ङ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अमर काळे, सुनील केदार, विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-*

*"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ३ — महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३६ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."*

*(च) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.राधाकृष्ण विखे-पाटील,*

*वि.स.स. यांचा प्रस्ताव :-*

*"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ३ – महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."*

*(छ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. हर्षवर्धन सपकाळ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-*

*"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ३ – महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या १५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."*

## *अशासकीय कामकाज*

*(बैठकीच्या अखेरचे २ १/२ तास)*

*आठ : अशासकीय विधेयक :-*

*पुर:स्थापनार्थ :*

*सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ५ - महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासवर्ग जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन (सुधारणा) विधेयक, २०१७ - श्री.मनोहर भोईर, वि.स.स. यांचे.*

*नऊ : अशासकीय ठराव (म.वि.स. नियम १०६ अन्वये) :-*

*(सदरहू ठराव बॅलटद्वारा ठरविण्यात आलेल्या प्राथम्यक्रमानुसार दर्शविण्यात आले आहेत.) (क्रमांक १ ते ३)*

*(१) श्री.नितेश राणे, वि.स.स. यांचा ठराव क्र. १४*

*"राज्यातील किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्व लक्षात घेता या किल्ल्यांचे परिसर पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी तसेच त्या ठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व पर्यटकांसाठी अन्य आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करून देऊन या सर्व किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्व कायम राखण्याच्या दृष्टीने शासनाने खास उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."*

*(२) डॉ. भारती लव्हेकर, वि.स.स. यांचा ठराव क्र. २००*

*"राज्यात शहरी तसेच ग्रामीण भागात महिलांकरिता स्वतंत्र स्वच्छतागृहाची सोय उपलब्ध होण्याच्या दृष्टीने गावात महिलांसाठी स्वतंत्र सार्वजनिक महिला स्वच्छतागृहे बांधण्यात यावीत, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."*

*(३) श्री.अजय चौधरी, वि.स.स. यांचा ठराव क्र. २८*

*"राज्यात उद्योग जगात मोठ्या प्रमाणावर स्थानिक भूमिपुत्रांना रोजगार उपलब्ध न होणे, उद्योगामध्ये भूमीपुत्रांची संख्या नगण्य असल्याने राज्यात बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढणे, राज्यातील सेवायोजन कार्यालयामध्ये लाखो तरुणांनी नोकरीसाठी केलेली नोंद, उद्योगांमध्ये भूमीपुत्रांना नोकऱ्या देण्यास शासन अपयशी ठरल्याने राज्यातील सुशिक्षीत तरुणांमध्ये पसरलेले नैराश्य, राज्यातील बेरोजगार भूमीपुत्रांच्या हक्काचे रक्षण करण्यासाठी यापुढे राज्यातील शासकीय, निमशासकीय तसेच खाजगी आस्थापनांवरील कार्यालयामध्ये नोकरी देताना भूमीपुत्रांना प्राधान्याने नोकरीत घेण्यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."*

*विधान भवन,*
*मुंबई,*
*दिनांक : ९ मार्च, २०१७*

*डॉ. अनंत कळसे,*
*प्रधान सचिव,*
*महाराष्ट्र विधानसभा.*